जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 DEC 2022
लोकमत

# विद्यापीठाचे प्रश्न सोडविण्यासाठी मदत करणार : क्षीरसागर

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी या नात्याने या विद्यापीठाच्या प्रगतीसाठी आणि प्रश्न सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न, सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही राज्य नियोजन मंडळाचे कार्याध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी गुरुवारी येथे केले. त्यांनी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी त्यांचा सत्कार केला.



विद्यापीठात आणखी विद्यार्थिनी वसतिगृहांची उभारणी, विद्यापीठाला सौरऊर्जेतील आधारे ऊर्जेच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण करण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून मदत करण्याबाबत विचार करता येईल. भुयारी मार्ग, विद्यापीठ हवामान बदल आणि गूळ संशोधनाच्या उपक्रमांना मदत करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केला जाईल. विद्यापीठाने यासंदर्भात शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावांसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात येईल, असे क्षीरसागर यांनी सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी विद्यापीठाविषयी सादरीकरण केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्रभारी वित्त व लेखाधिकारी आर. वाय. लिधडे, आदी उपस्थित होते.

पुढारी

# उद्योग, शैक्षणिक संस्थांमधील परिसंवाद काळाची गरज

## प्र. कुलगुरू डॉ. पाटील यांचे प्रतिपादन



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्पर्धेच्या युगात उद्योग संस्था यांच्यात परस्पर संवाद, उद्योगाशी मजबूत संबंध विकसित करण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीतून स्वतःला नवनवीन कौशल्यांच्या जोरावर अद्ययावत करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम. बी. ए. विभागातर्फे आयोजित एकदिवसीय उद्योग-शैक्षणिक संस्था संवाद कार्यशाळेच्या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्रा. डॉ. पाटील म्हणाले, जिद्द, चिकाटी, साहस, प्रचंड मेहनत व विविध कौशल्य आत्मसात करून जीवनात यशस्वी होता येते. सीए नितीन हारुगडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून स्वतःला अद्ययावत करणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यवसायात चांगली संधी आहे ती शोधून योग्य वेळी पाऊल उचलणे ही काळाची गरज आहे. उद्योजक संग्राम पाटील म्हणाले, भारताला महासत्ता बनवण्याचा मार्ग डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी दिला. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी प्रचंड कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. यावेळी एमबीए विभागाचे प्र. संचालक, प्रा. डॉ. ए. एम. गुरव, प्रा. डॉ. दीपा इंगवले, डॉ. केदार मारुलकर उपस्थित होते.

05 DEC 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॉनस्टिक वस्तुंच्या वापराने यकृताचे विकार

## अमेरिकेतील कॉन्सास विद्यापीठातील शास्त्रज्ञ डॉ. उद्यन आपटे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या नॉनस्टीक वस्तुंमुळे यकृताचे विकार उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे त्यांचा अतिवापर टाळावा, नॉनस्टिकमुळे यकृताच्या आजारांवर संशोधन करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील कान्सास विद्यापीठातील फार्मेकॉलॉजी–टॉक्झिकॉलॉजी विभागातील शास्त्रज्ञ डॉ. उद्यन आपटे यांनी दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात 'डेसिफरिंग मॅकेनिझम्स ऑफ लीव्हर टॉक्झिसिटी इन्ड्युस्ड बाय पॉलीफ्लुरोअल्काईल सबस्टन्सेस (पी.एफ.ए.एस.) युजिंग ग्लोबल जीन एक्स्प्रेशन एनालिसीस" या विषयावरील व्याख्यानामध्ये ते बोलत होते. डॉ. आपटे म्हणाले, नॉनस्टिक भांडी, रेनकोट, वॉटरप्रुफ मेकअप उत्पादने आणि स्टेनप्रूफ कपड्यांच्या



कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना अमेरिकेतील शास्त्रज्ञ डॉ. उद्यन आपटे.

अतिवापरामुळे यकृताचे आजार होऊ शकतात. पी.एफ.ए.एस. रसायनांच्या अतिवापरामुळे रोगप्रतिकारक शक्ती, प्रजननक्षमता, गर्भवाढ आणि यकृतावर दुष्परिणाम होतात. तसेच कर्करोगासारखे घातक आजारही उद्भवू शकतात. अथक सात वर्षांच्या संशोधनानंतर माझ्या असे लक्षात आले की, पी.एफ.ए.एस.चा अर्धायुकाल (हाफ लाईफ पिरियड) तीन वर्षांचा असून त्याचे विघटन लवकर होत नाही. त्याचा यकृताशी संबंध आल्यास यकृताला सूज येणे, यकृतात चरबी साठणे तसेच हायपर कोलेस्ट्रोलेमियाचा धोका उद्भवतो. भारतामध्ये याचा वापर अतिरिक्त असूनही त्यावर अजून संशोधन झालेले नाही. अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी केले. डॉ. एन. ए. कांबळे यांनी आभार मानले. यावेळी डी. वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. मेघनाद जोशी, वेंगुर्ला येथील बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालयाचे डॉ. वसंत पाटोळे, डॉ. नितिन पोटफोडे, सुभाष मुंजे, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. एस. आर. यंकंची, डॉ. एम. पी. भिलावे, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

तरूण भारत

# उद्योगाबरोबर शैक्षणिक संस्थांचा संवाद काळाची गरज



■ प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्पर्धेच्या युगात उद्योग संस्था यांच्यात परस्पर संवाद, उद्योगाशी मजबूत संबंध विकसित करण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीतून स्वतःला नवनवीन कौशल्यांच्या जोरावर अद्यावत करणे गरजेचे आहे. कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात संवाद असला पाहिजे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए विभागाच्या वतीने आयोजित 'एकदिवसीय उद्योग-शैक्षणिक संस्था संवाद कार्यशाळेच्या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्र. ते बोलत होते.

सी.ए. नितीन हारुगडे म्हणाले, विद्यार्थ्यांना स्वप्ने मोठी पाहून स्वतःला अद्ययावत करणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यवसायातील चांगली संधी शोधून योग्य वेळी पाऊल उचलले पाहिजे. सूक्ष्म मध्यम व लघु उद्योगांबाबत, भांडवल उभारणी , प्रकल्प अहवाल, प्रक्रिया उद्योग आदी विषयावर मार्गदर्शन केले. उद्योजक संग्राम पाटील म्हणाले, भारताला महासत्ता बनवण्याचा मार्ग डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी दिला. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी प्रचंड कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. यशस्वी होण्यासाठी भूक निर्माण झाली पाहिजे. लोकांच्या बरोबर काम करण्याची क्षमता असायला हवी तसेच उद्योगांबरोबर सामाजिक जबाबदारी घेतली पाहिजे.

उद्योजक संजय पेंडसे म्हणाले, कोणताही उद्योग सुरू करताना सखोल अभ्यास, प्रत्यक्ष अनुभव, कौशल्य, प्रामाणिकपणा, सचोटी, पद्धतशीरपणा, प्रचंड मेहनत याच्या जोरावर जीवनात यशस्वी होता येते. यावेळी डॉ. ए. एम. गुरव, डॉ. दीपा इंगवले, डॉ. केदार मारुलकर, डॉ. रामदास बोलके आदी उपस्थित होते.

Times of India

# SUK students can apply for certificates from today

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The online process to file the application to seek the degree, diploma and PhD certificates of Shivaji University, Kolhapur, will start from Monday.

The convocation ceremony of the university will be held in the last week of February or the first week of March. The graduation certificates will be handed over to the students who have passed the examination taken before March 2022.

The students applying earlier will have to pay a fee of Rs 250, while those who file the applications late have to pay Rs 850. The last date for the online application is January 3 for diploma, degree graduates and for the PhD cleared students, it is January 8. The university, in the notice issued for the students, has stated that the students should fill up the course code for the year of qualification correctly to get the certificate. The university can furnish the certificate for the students who qualified way back in 2002.